श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भागवत रामायण स्तोत्र (9.10)



धरा हुई धन्य, व्याप्त हुआ आह्लाद
नारायण अवतारों पर, ब्रह्मा नारद संवाद

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

नवमः(स्) स्कन्धः

अथ दशमोऽध्यायः

श्रीशुक उवाच
खट्वां(ङ्)गाद् दीर्घबाहुश्च, रघुस्तस्मात् पृथुश्रवाः ।
अजस्ततो महाराजस्- तस्माद् दशरथोऽभवत् ॥ 1॥

श्रीशुकाचार्य म्हणतात - खट्वांगाचा पुत्र दीर्घबाहू आणि दीर्घबाहूचा परम यशस्वी पुत्र रघू झाला. रघूचा अज आणि अजाचा पुत्र महाराज दशरथ झाला. ॥ 1 ॥

तस्यापि भगवानेष, साक्षाद् ब्रह्ममयो हरिः ।
अं(म्)शां(म्)शेन चतुर्धागात्, पुत्रत्वं(म्) प्रार्थितः(स्) सुरैः ।
रामलक्ष्मणभरत- शत्रुघ्ना इति सं(ञ्)ज्ञया ॥ 2॥
चतुर् + धागात्

देवांनी प्रार्थना केल्यावरून साक्षात परब्रह्म भगवान श्रीहरीच आपल्या अंशानेच चार रूपे धारण करून राजा दशरथाचे पुत्र झाले. राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न अशी त्यांची नावे होती. ॥ 2 ॥

**तस्यानुचरितं(म्) राजन्- नृषिभिस्तत्त्वदर्शिभिः ।**

**श्रुतं(म्) हि वर्णितं(म्) भूरि, त्वया सीतापतेर्मुहुः ॥ 3॥**

**नृषिभिस्+ तत्त्व+ दर्शिभिः**

परीक्षिता ! सीतापती भगवान श्रीरामांचे चरित्र तत्त्वज्ञानी ऋषींनी पुष्कळसे वर्णन केले आहे आणि तू ते अनेक वेळा ऐकलेही आहेस. ॥ 3 ॥

**गुर्वर्थे त्यक्तराज्यो व्यचरदनुवनं(म्) पद्मपद्भ्यां(म्) प्रियायाः(फ्)**

**पाणिस्पर्शाक्षमाभ्यां(म्) मृजितपथरुजो यो हरीन्द्रानुजाभ्याम् ।**

**वैरूप्याच्छूर्पणख्याः(फ्) प्रियविरहरुषा-ऽऽरोपितभ्रूविजृम्भ-**

**त्रस्ताब्धिर्बद्धसेतुः(ख्) खलदवदहनः(ख्) कोसलेन्द्रोऽवतान्नः ॥ 4॥**

**पद्म+ पद्भ्यां(म्), पाणि+ स्पर्शा+ क्षमाभ्यां(म्), वैरूप्याच्+ छूर्पणख्याः(फ्)**

**रोपितभ्रू+ विजृम्भ, त्रस्ताब्धिर्+ बद्ध सेतुः(ख्)**

भगवान श्रीरामांनी आपल्या पित्याचे वचन सत्य करण्यासाठी राज्य सोडले आणि ते कमळासारख्या कोमल चरणांनी राना-वनांत फिरत राहिले. त्यांचे चरण इतके कोमल होते की, प्रियेच्या हातांचा स्पर्शसुद्धा त्यांना सहन होत नव्हता. तीच पावले जेव्हा वनात चालून चालून थकून जात, तेव्हा हनुमान आणि लक्ष्मण ती चुरून त्यांचा थकवा दूर करीत. शूर्पणखेला विद्रूप केल्यामुळे त्यांना प्रियेचा वियोग सहन करावा लागला. या वियोगामुळे क्रोधाने त्यांनी भुवया चढवल्या, त्या पाहून समुद्रसुद्धा भयभीत झाला. यानंतर त्यांनी समुद्रावर सेतू बांधला आणि लंकेत जाऊन दुष्ट राक्षसरूप जंगल दावाग्नीप्रमाणे भस्म करून टाकले. ते अयोध्याधिपती आमचे रक्षण करोत. ॥ 4 ॥

**विश्वामित्राध्वरे येन, मारीचाद्या निशाचराः ।**

**पश्यतो लक्ष्मणस्यैव, हता नैर्ऋतपुं(ङ्)गवाः ॥ 5॥**

**नैर्+ ऋत+ पुं(ङ्)गवाः**

श्रीरामांनी विश्वामित्रांच्या यज्ञामध्ये लक्ष्मणादेखतच मारीच इत्यादी राक्षसश्रेष्ठांना ठार केले. ॥ 5 ॥

**यो लोकवीरसमितौ धनुरैशमुग्रं(म्)**

**सीतास्वयं(वँ)वरगृहे त्रिशतोपनीतम् ।**

**आदाय बालगजलील इवेक्षुयष्टिं(म्)**

**सज्जीकृतं(न्) नृप विकृष्य बभञ्ज मध्ये ॥ 6॥**

**लोकवी+ रसमितौ, त्रिशतो+ पनीतम्, इवेक्षु+ यष्टिं(म्)**

परीक्षिता ! सीतेच्या स्वयंवरमंडपात जगातील निवडक वीरांच्या सभेमध्ये तीनशे वीरांनी आणलेले भगवान शंकरांचे भयंकर धनुष्य ठेवले होते. श्रीरामांनी ते सहज उचलून त्याला दोरी लावून ते ओढले. तोच मधोमध त्याचे दोन तुकडे झाले. हत्तीच्या छाव्याने सहज ऊस मोडावा त्याप्रमाणे ॥ 6 ॥

**जित्वानुरूपगुणशीलवयोऽङ्गरूपां(म्),**

**सीताभिधां(म्) श्रियमुरस्यभिलब्धमानाम् ।**

**मार्गे व्रजन् भृगुपतेर्व्यनयत् प्ररूढं(न्)**

**दर्पं(म्) महीमकृत यस्त्रिरराजबीजाम् ॥ 7॥**

जित्वा+ नुरू+ पगुणशी+ लवयोऽङ्गरूपां(म्), श्रियमुरस् + यभिलब्ध+ मानाम्,

भृगुपतेर् + व्यनयत् , यस्+ त्रिररा+ जबीजाम्

वक्षःस्थळावर मानाने राहिलेल्या सीता नामक लक्ष्मीला त्यांनी स्वयंवरात जिंकले. त्या गुण, शील, वय, शरीराची ठेवण आणि सौंदर्य अशा सर्व बाबतीत श्रीरामांना शोभत होत्या. अयोध्येला परत येताना वाटेत, ज्यांनी एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली होती, त्या परशुरामांचा गर्व त्यांनी नष्ट केला ॥ 7 ॥

**यः(स्) सत्यपाशपरिवीतपितुर्निदेशं(म्)**

**स्त्रैणस्य चापि शिरसा जगृहे सभार्यः ।**

**राज्यं(म्) श्रियं(म्) प्रणयिनः(स्) सुहृदो निवासं(न्)**

**त्यक्त्वा ययौ वनमसूनिव मुक्तसं(ङ्)गः ॥ 8॥**

सत्यपा+ शपरिवी+ तपितुर्+ निदेशं(म्), वनमसू+ निव

जरी महाराज दशरथांनी पत्नीच्या अधीन होऊन तिला तसे वचन दिले होते, तरीसुद्धा ते त्या सत्यबंधनात बांधले गेले होते. म्हणून श्रीरामांनी त्यांचे वचन सत्य करण्यासाठी त्यांची आज्ञा शिरोधार्य मानली आणि जसा अनासक्त योगी प्राण सोडतो, तसे राज्य, लक्ष्मी, मित्र, हितचिंतक आणि महाल सोडून पत्नीबरोबर वनवास पत्करला ॥ 8 ॥

**रक्षः(स्)स्वसुर्व्यकृत रूपमशुद्धबुद्धेस्-**

**तस्याः(ख्) खरत्रिशिरदूषणमुख्यबन्धून् ।**

**जघ्ने चतुर्दशसहस्रमपारणीय-**

**कोदण्डपाणिरटमान उवास कृच्छ्रम् ॥ 9॥**

रक्षः(स्) + स्वसुर्+ व्यकृत, खरत्रिशिरदू+ षणमुख्य+ बन्धून्,

चतुर्दश+ सहस्र+ मपारणीय, कोदण्ड+ पाणि+ रटमान

वनात गेल्यावर त्यांनी रावणाची बहीण शूर्पणखा हिला विद्रूप केले. कारण ती कामुक विचारांची होती. तिच्या खर, दूषण, त्रिशिरा या भावांना व अन्य चौदा हजार राक्षसांना, हातात महान धनुष्य घेऊन श्रीरामांनी ठार केले आणि अनेक प्रकारच्या अडचणी असलेल्या वनामध्ये इकडे तिकडे विहार करीत ते निवास करून राहिले॥ 9 ॥

सीताकथाश्रवणदीपितहृच्छयेन
सृष्टं(वँ) विलोक्य नृपते दशकन्धरेण ।
जघ्नेऽद्भुतैणवपुषाऽऽश्रमतोऽपकृष्टो
मारीचमाशु विशिखेन यथा कमुग्रः ॥ 10॥

सीताकथा+ श्रवणदी+ पितहृच्छयेन, जघ्नेऽद्+ भुतै+ णवपुषाऽऽ+ श्रमतोऽ+ पकृष्टो, मारी+ चमाशु

परीक्षिता ! रावणाने जेव्हा सीतेच्या रूप-गुणांविषयी ऐकले, तेव्हा त्याचे हृदय कामवासनेने आतुर झाले. त्याने मारीचाला अद्भुत हरिणाच्या रूपात तिच्या पर्णकुटीजवळ पाठविले. तो श्रीरामांना दूरवर घेऊन गेला. जसे दक्षप्रजापतीला वीरभद्राने मारले होते, तसेच त्यांनी आपल्या बाणाने त्याला तत्काळ मारून टाकले. ॥ 10 ॥

रक्षोऽधमेन वृकवद् विपिनेऽसमक्षं(वँ),
वैदेहराजदुहितर्यपयापितायाम् ।
भ्रात्रा वने कृपणवत् प्रियया वियुक्तः(स्),
स्त्रीसं(ङ्)गिनां(ङ्) गतिमिति प्रथयं(म्)श्चचार ॥ 11॥

विपिनेऽ+ समक्षं(वँ), वैदेह+ राजदुहितर्+ यपया+ पितायाम्

नीच राक्षस रावणाने लांडग्याप्रमाणे श्रीरामलक्ष्मणांच्या अनुपस्थितीत विदेहनंदिनी श्रीसीतादेवींचे अपहरण केले. त्यानंतर ते आपल्या प्राणप्रिय सीतेच्या वियोगाने, भाऊ लक्ष्मणासह, जंगलामध्ये दीनवाणे होऊन फिरू लागले. जे स्त्रियांमध्ये आसक्त असतात, त्यांची अशीच गती होते, हेच जणू त्यांनी दाखविले ॥ 11 ॥

दग्ध्वाऽऽत्मकृत्यहतकृत्यमहन् कबन्धं(म्),
सख्यं(वँ) विधाय कपिभिर्दयितागतिं(न्) तैः ।
बुद्ध्वाथ वालिनि हते प्लवगेन्द्रसैन्यैर्-
वेलामगात् स मनुजोऽजभवार्चिताङ्घ्रिः ॥ 12॥

दग्ध्वाऽऽत्म+ कृत्य+ हतकृत्य+ महन्, कपिभिर्+ दयितागतिं(न्), मनुजोऽ+ जभवार्+ चिताङ्घ्रिः

यानंतर, ज्याची सर्व कर्मबंधने रावणाशी युद्ध करण्याच्या भगवत्सेवारूप कर्माने अगोदरच भस्म झाली होती, त्या जटायूवर श्रीरामांनी अग्निसंस्कार केला. पुढे त्यांनी कबंधाचा संहार केला आणि त्यापाठोपाठ सुग्रीव इत्यादी वानरांशी मैत्री करून वालीचा वध केला. त्यानंतर वानरांच्या द्वारा आपल्या प्रियेचा शोध लावला. ब्रह्मदेव आणि शंकर ज्यांच्या चरणांची पूजा करतात, तेच मनुष्यरूप भगवान श्रीराम वानरसेनेसह समुद्रतटावर पोहोचले ॥ 12 ॥

यद्रोषविभ्रमविवृत्तकटाक्षपात-
सं(म्)भ्रान्तनक्रमकरो भयगीर्णघोषः ।
सिन्धुः(श्) शिरस्यर्हणं(म्) परिगृह्य रूपी
पादारविन्दमुपगम्य बभाष एतत् ॥ 13॥

यद्रोषवि+ भ्रमविवृत्त+ कटाक्षपात, सं(म्)भ्रान्+ तनक्रमकरो

(तेथे तीन रात्री उपवास करूनही समुद्र भेटायला आला नाही, तेव्हा) भगवंतांनी क्रोधाने आपली नजर समुद्रावर टाकली, त्यावेळी समुद्रातील मगरी आणि मासे गडबडले. भ्याल्यामुळे समुद्राची गर्जना शांत झाली, तेव्हा शरीर धारण करून आणि आपल्या डोक्यावर अर्घ्यादी वस्तू घेऊन समुद्र भगवंतांच्या चरणकमलांना शरण आला आणि म्हणू लागला ॥ 13 ॥

न त्वां(वँ) वयं(ञ्) जडधियो नु विदाम भूमन्

कूटस्थमादिपुरुषं(ञ्) जगतामधीशम् ।

यत्सत्त्वतः(स्) सुरगणा रजसः(फ्) प्रजेशा

मन्योश्च भूतपतयः(स्) स भवान् गुणेशः ॥ 14॥

कूटस्थमा+ दिपुरुषं(ञ्)

अनंता ! आम्ही मूढ असल्याकारणाने जगाचे एकमेव स्वामी, आदिकारण आणि अविनाशी अशा आपल्या खऱ्या स्वरूपाला जाणत नाही. आपण सर्व गुणांचे स्वामी आहात. म्हणून जेव्हा आपण सत्त्वगुणाचा स्वीकार करता, तेव्हा देवतांची, रजोगुणाचा स्वीकार करता तेव्हा प्रजापतींची आणि तमोगुणाचा स्वीकार करता, तेव्हा आपल्या क्रोधाने रुद्रगणांची उत्पत्ती होते ॥ 14 ॥

कामं(म्) प्रयाहि जहि विश्रवसोऽवमेहं(न्)

त्रैलोक्यरावणमवाप्नुहि वीर पत्नीम् ।

बध्नीहि सेतुमिह ते यशसो वितत्यै

गायन्ति दिग्विजयिनो यमुपेत्य भूपाः ॥ 15॥

त्रैलोक्य+ रावणमवाप् + नुहि

हे वीरशिरोमणे ! आपण आपल्या इच्छेनुसार मला पार करून जा व त्रैलोक्याला रडविणाऱ्या विश्रवाचा कुपुत्र रावण याला मारून आपल्या पत्नीला घेऊन या. येथे माझ्यावर एक सेतू बांधा. त्यामुळे आपल्या यशाचा विस्तार होईल आणि पुढे जेव्हा मोठ-मोठे नरपती दिग्विजय करीत येथे येतील, तेव्हा ते आपल्या यशाचे गायन करतील." ॥ 15 ॥

बद्ध्वोदधौ रघुपतिर्विविधाद्रिकूटैः(स्)

सेतुं(ङ्) कपीन्द्रकरकम्पितभूरुहाङ्गैः ।

सुग्रीवनीलहनुमत्प्रमुखैरनीकैर्-

लङ्कां(वँ)विभीषणदृशाऽऽविशदग्रदग्धाम् ॥ 16॥

रघुपतिर्+ विविधा+ द्रिकूटैः(स्), कपीन्द्र+ करकम्पित+ भूरुहाङ्गैः

सुग्रीवनी+ लहनुमत्+ प्रमुखै+ रनीकैर्, लङ्कां(वँ)+ विभीषणदृशाऽऽ+ विशदग्र+ दग्धाम्

भगवान श्रीरामांनी कित्येक पर्वतांच्या शिखरांनी समुद्रावर पूल बांधला. जेव्हा मोठ-मोठे वानर आपल्या हातांनी पर्वत उचलून आणीत, तेव्हा त्यावरील झाडे आणि मोठ-मोठे शिलाखंड थरथर कापत असत. यानंतर भगवंतांनी बिभीषणाच्या सल्ल्याने सुग्रीव, नील, हनुमान इत्यादी प्रमुख असणाऱ्या वानरसेनेच्या बरोबर लंकेत प्रवेश केला. हनुमंतांनी ती अगोदरच जाळली होती ॥ 16 ॥

सा वानरेन्द्रबलरुद्धविहारकोष्ठ-

श्रीद्वारगोपुरसदोवलभीविटं(ङ्)का ।

निर्भज्यमानधिषणध्वजहेमकुम्भ-

शृं(ङ्)गाटका गजकुलैर्ह्रदिनीव घूर्णा ॥ 17॥

वानरेन्द्र+ बलरुद्ध+ विहार+ कोष्ठ, श्रीद्वारगो+ पुरसदो+ वलभी+ विटं(ङ्)का, निर्भज्यमा+ नधिषणध्+ वजहे+ मकुम्भ, गजकुलैर्+ ह्रदिनीव

त्यावेळी वानरांच्या सेनेने लंकेतील फेरफटका मारण्याची ठिकाणे, खेळाची मैदाने, धान्याची गोदामे, खजिने, दरवाजे, फाटके, सभागृहे, सज्जे आणि पक्ष्यांची घरटीसुद्धा वेढली. त्यांनी तेथील आसने, ध्वज, सोन्याचे कळस आणि चौक तोडून-फोडून टाकले. हत्तींच्या झुंडींनी नदीचे पाणी खळबळून टाकावे त्याप्रमाणे. ॥ 17 ॥

रक्षः(फ्)पतिस्तदवलोक्य निकुम्भकुम्भ-

धूम्राक्षदुर्मुखसुरान्तनरान्तकादीन् ।

पुत्रं(म्) प्रहस्तमतिकायविकम्पनादीन्

सर्वानुगान् समहिनोदथ कुम्भकर्णम् ॥ 18॥

रक्षः(फ्)पतिस्+ तदवलोक्य, धूम्राक्षदुर्+ मुखसुरान्+ तनरान्+ तकादीन्

प्रहस्त+ मतिकाय+ विकम्प+ नादीन्

हे पाहून राक्षसराज रावणान निकुम, कुम, धूम्राक्ष, दुर्मुख, सुरांतक, नरांतक, प्रहस्त, अतिकाय, विकंपन इत्यादी आपले सर्व सेनापती, पुत्र मेघनाद आणि शेवटी भाऊ कुंभकर्ण यांनाही युद्ध करण्यासाठी पाठविले ॥ 18 ॥

तां(यँ) यातुधानपृतनामसिशूलचाप-

प्रासर्ष्टिशक्तिशरतोमरखड्गदुर्गाम् ।

सुग्रीवलक्ष्मणमरुत्सुतगन्धमाद-

नीलां(ङ्)गदर्क्षपनसादिभिरन्वितोऽगात् ॥ 19॥

यातुधा+ नपृतना+ मसिशूलचाप, प्रासर्ष्टि+ शक्तिशरतो+ मरखड्+ गदुर्गाम्

सुग्रीव+ लक्ष्मणमरुत्+ सुतगन्धमाद, नीलां(ङ्)गदर्+ क्षपनसा+ दिभिरन्+ वितोऽगात्

राक्षसांची ती विशाल सेना तलवारी, त्रिशूळ, धनुष्ये, प्रास, ऋष्टी, शक्ती, बाण, भाले, खड्गे इत्यादी शस्त्रास्त्रांमुळे अजिंक्य होती. भगवान श्रीरामांनी सुग्रीव, लक्ष्मण, हनुमान, गंधमादन, नील, अंगद, जांबवान, पनस इत्यादी वीरांना बरोबर घेऊन राक्षसांच्या सेनेवर हल्ला केला ॥ 19 ॥

तेऽनीकपा रघुपतेरभिपत्य सर्वे

द्वन्द्वं(वँ) वरूथमिभपत्तिरथाश्वयोधैः ।

जघ्नुर्द्रुमैर्गिरिगदेषुभिरं(ङ्)गदाद्याः(स्)

सीताभिमर्शहतमं(ङ्)गलरावणेशान् ॥ 20॥

वरू+थमिभपत्ति+ रथाश्+ वयोधैः, जघ्नुर्+ द्रुमैर्+ गिरिगदे+ षुभिरं(ङ्)गदाद्याः(स्)

सीताभिमर्+ शहतमं(ङ्)गलरा+ वणेशान्

श्रीरामांचे अंगदादी सर्व सेनापती, राक्षसांच्या हत्ती, रथ, घोडे आणि पायदळ अशा चतुरंग सेनेशी द्वंद्वयुद्ध करून त्यांना वृक्ष, पर्वतशिखरे, गदा आणि बाणांनी मारू लागले. वास्तविक श्रीसीतादेवींना स्पर्श केल्यामुळे ज्याचे अगोदरच अकल्याण झाले होते, त्या रावणाच्या पक्षाचे ते असल्याने आधीच मेल्यासारखे होते ॥ 20 ॥

रक्षः(फ्)पतिः(स्) स्वबलनष्टिमवेक्ष्य रुष्ट

आरुह्य यानकमथाभिससार रामम् ।

स्वः(स्)स्यन्दने द्युमति मातलिनोपनीते

विभ्राजमानमहनन्निशितैः क्षुरप्रैः ॥ 21॥

स्वबलनष्+ टिमवेक्ष्य, यानकमथा+ भिससार,

मातलिनो+पनीते, विभ्राजमा+ नमहनन्+ निशितैः

राक्षसराज रावणाने जेव्हा पाहिले की, आपली सेना नष्ट होऊ लागली आहे, तेव्हा तो चिडून पुष्पक विमानात बसून, श्रीरामांच्यावर चालून आला. त्यावेळी इंद्राचा सारथी मातली एक तेजस्वी दिव्य रथ घेऊन आला. श्रीराम जेव्हा त्यावर विराजमान झाले, तेव्हा रावण आपल्या तीक्ष्ण बाणांनी त्यांच्यावर प्रहार करू लागला ॥ 21 ॥

रामस्तमाह पुरुषादपुरीष यन्नः(ख्)

कान्तासमक्षमसतापहृता श्ववत् ते ।

त्यक्तत्रपस्य फलमद्य जुगुप्सितस्य

यच्छामि काल इव कर्तुरलं(ङ्)घ्यवीर्यः॥ 22॥

कान्ता+ समक्ष+ मसता+ पहृता, जुगुप् + सितस्य

श्रीराम त्याला म्हणाले, "नीच राक्षसा ! कुत्र्याप्रमाणे तू आमच्या माघारी आमच्या पत्नीचे हरण केलेस. तुझ्या दुष्टपणाची हद्द झाली. तुझ्यासारखा निर्लज्ज आणि निंदनीय दुसरा कोण असू शकेल ? ज्याप्रमाणे समर्थ काळाला कर्तृत्वसंपन्नसुद्धा टाळू शकत नाही, त्याचप्रमाणे आज मी तुला तुझ्या कृत्याचे फळ भोगायला लावतो." ॥ 22 ॥

एवं(ङ्) क्षिपन् धनुषि सन्धितमुत्ससर्ज

बाणं(म्) स वज्रमिव तद्धृदयं(म्) बिभेद ।

सोऽसृग् वमन् दशमुखैर्न्यपतद् विमानाद्-

धाहेति जल्पति जने सुकृतीव रिक्तः ॥ 23॥

सन्धितमुत्+ ससर्ज, दशमुखैर्+ न्यपतद्

अशा प्रकारे रावणाची निर्भर्त्सना करीत श्रीरामांनी आपल्या धनुष्यावर चढविलेला बाण त्याच्यावर सोडला. त्या बाणाने वज्रासारखे असलेले त्याचे हृदय विदीर्ण केले. जसे पुण्यात्मे पुण्य संपल्यावर स्वर्गातून खाली पडतात, प्रमाणे तो आपल्या दहाही तोंडातून रक्त ओकीत विमानातून खाली पडला. त्यावेळी त्याचे बांधव "हाय हाय" करून ओरडू लागले ॥ 23 ॥

ततो निष्क्रम्य लं(ङ्)काया, यातुधान्यः(स्) सहस्रशः ।

मन्दोदर्या समं(न्) तस्मिन्, प्ररुदत्य उपाद्रवन् ॥ 24॥

त्यावेळी हजारो राक्षसिणी मंदोदरीसह रडत रडत लंकेच्या महालांतून बाहेर पडून रणभूमीवर आल्या ॥ 24 ॥

स्वान् स्वान् बन्धून् परिष्वज्य, लक्ष्मणेषुभिरर्दितान् ।

रुरुदुः(स्) सुस्वरं(न्) दीना, घ्नन्त्य आत्मानमात्मना ॥ 25॥

लक्ष्मणे+ षुभिरर्+ दितान्

लक्ष्मणांच्या बाणांनी छिन्न-विच्छिन्न होऊन पडलेल्या आपल्या आप्तांना कवटाळून त्या हातांनी आपली छाती बडवीत मोठमोठ्याने विलाप करू लागल्या ॥ 25 ॥

हा हताः(स्) स्म वयं(न्) नाथ, लोकरावण रावण ।

कं(यँ) यायाच्छरणं(लँ) लं(ङ्)का, त्वद्विहीना परार्दिता ॥ 26॥

यायाच्+ छरणं(लँ),त्वद्+ विहीना

हाय ! हाय ! लोकांना दहशत बसविणारे रावणमहाराज ! आज आमचा घात झाला ! आपण नसल्यामुळे शत्रूनी लंकेची दुर्दशा केली आहे. आता तिचे रक्षण कोण करणार ? ॥ 26 ॥

नैवं(वँ) वेद महाभाग, भवान् कामवशं(ङ्) गतः ।

तेजोऽनुभावं(म्) सीताया, येन नीतो दशामिमाम् ॥ 27॥

महाराज ! आपण कामवश झाल्याने सीतादेवींचा प्रभाव जाणला नाही. त्यामुळे आपली ही दशा झाली ! ॥27॥

कृतैषा विधवा लं(ङ्)का, वयं(ञ्) च कुलनन्दन ।

देहः(ख्) कृतोऽन्नं(ङ्) गृध्राणा- मात्मा नरकहेतवे ॥ 28॥

आपण राक्षस कुळाला आनंद देत होता. पण आज आम्ही सर्वजण आणि ही लंका विधवा झाली. आपले हे शरीर गिधाडांचे खाद्य बनले आणि आत्मा नरकाचा अधिकारी बनला ॥ 28 ॥

श्रीशुक उवाच

स्वानां(वँ) विभीषणश्चक्रे, कोसलेन्द्रानुमोदितः ।

पितृमेधविधानेन, यदुक्तं(म्) साम्परायिकम् ॥ 29॥

विभीषणश् + चक्रे, कोसलेन्+ द्रानुमोदितः,

श्रीशुक म्हणतात - श्रीरामचंद्रांच्या आज्ञेने बिभीषणाने आपल्या नातलगांचे पितृयज्ञाच्या विधीने शास्त्रानुसार अंत्येष्टिकर्म केले ॥ 29 ॥

ततो ददर्श भगवा- नशोकवनिकाश्रमे ।

क्षामां(म्) स्वविरहव्याधिं(म्), शिं(म्)शपामूलमास्थिताम् ॥ 30॥

शिं(म्)शपा+ मूलमास् + थिताम्

नंतर भगवान श्रीरामांनी अशोकवाटिकेच्या आश्रमात अशोक वृक्षाच्या खाली बसलेल्या श्रीसीतादेवींना पाहिले. त्या आपल्या विरहाने दुःखी आणि कृश झाल्या होत्या ॥ 30 ॥

रामः(फ्) प्रियतमां(म्) भार्यां(न्), दीनां(वँ) वीक्ष्यान्वकम्पत ।

आत्मसं(न्)दर्शनाह्लाद-विकसन्मुखपं(ङ्)कजाम् ॥ 31॥

वीक्ष्यान्+ वकम्पत, आत्म+ सं(न्)दर्शनाह्लाद, विकसन्+ मुखपं(ङ्)कजाम्

आपल्या प्राणप्रिय अर्धांगिनीला दीन अवस्थेत पाहून श्रीरामांचे हृदय करुणेने व्याकूळ झाले. इकडे भगवंतांचे दर्शन झाल्याने सीतादेवींचे हृदय आनंदाने भरून गेले. त्यामुळे त्यांचे मुखकमल उल्हसित झाले ॥ 31 ॥

आरोप्यारुरुहे यानं(म्), भ्रातृभ्यां(म्) हनुमद्युतः ।

विभीषणाय भगवान्, दत्त्वा रक्षोगणेशताम् ॥ 32॥

लं(ङ्)कामायुश्च कल्पान्तं(यँ), ययौ चीर्णव्रतः(फ्) पुरीम् ।

अवकीर्यमाणः(ख्) कुसुमैर्- लोकपालार्पितैः(फ्) पथि ॥ 33॥

लोक+ पालार्+ पितैः(फ्)

भगवंतांनी बिभीषणाला राक्षसांचे आधिपत्य, लंकेचे राज्य आणि एक कल्पाचे आयुष्य दिले. त्यानंतर अगोदर सीतादेवींना विमानात बसविले. नंतर लक्ष्मण, सुग्रीव, हनुमंत यांसह आपण बसले. अशा प्रकारे चौदा वर्षे पूर्ण करून ते आपल्या नगरीकडे परतले. त्यावेळी वाटेत ब्रह्मदेवादी लोकपाल त्यांच्यावर पुष्पवर्षाव करीत होते. ॥ 32-33 ॥

उपगीयमानचरितः(श्), शतधृत्यादिभिर्मुदा ।

गोमूत्रयावकं(म्) श्रुत्वा, भ्रातरं(वँ) वल्कलाम्बरम् ॥ 34॥

शतधृत्या+ दिभिर्मुदा, वल्कलाम्+ बरम्

महाकारुणिकोऽतप्यज्- जटिलं(म्) स्थण्डिलेशयम् ।

भरतः(फ्) प्राप्तमाकर्ण्य, पौरामात्यपुरोहितैः ॥ 35॥

महाका+ रुणिकोऽ+ तप्यज्, पौरामात् + यपुरोहितैः

पादुके शिरसि न्यस्य, रामं(म्) प्रत्युद्यतोऽग्रजम् ।

नन्दिग्रामात् स्वशिबिराद्, गीतवादित्रनिः(स्)स्वनैः ॥ 36॥

प्रत्युद्द + यतोऽ+ ग्रजम्, गीतवा+ दित्रनिः(स्)स्वनैः

ब्रह्मघोषेण च मुहुः(फ्), पठद्भिर्ब्रह्मवादिभिः ।

स्वर्णकक्षपताकाभिर् - हैमैश्चित्रध्वजै रथैः ॥ 37॥

पठद्भिर्+ ब्रह्मवादिभिः, स्वर्णकक्ष+ पताकाभिर्, हैमैश्+ चित्रध्वजै

सदश्वै रुक्मसन्नाहैर् - भटैः(फ्) पुरटवर्मभिः ।
श्रेणीभिर्वारमुख्याभिर्- भृत्यैश्चैव पदानुगैः ॥ 38॥

रुक्मसन्+ नाहैर्, श्रेणी+ भिर्वा+ रमुख्याभिर्, भृत्यैश्+ चैव

पारमेष्ठ्यान्युपादाय, पण्यान्युच्चावचानि च ।
पादयोर्न्यपतत् प्रेम्णा, प्रक्लिन्नहृदयेक्षणः ॥ 39॥

पारमेष्ठ्यान्+ युपादाय, पण्यान्+ युच्चा+ वचानि, पादयोर्+ न्यपतत्, प्रक्लिन्+ नहृदयेक्षणः

इकडे ब्रह्मदेवादी देव आनंदाने भगवंतांच्या लीलांचे गायन करीत होते. जेव्हा भगवंतांना समजले की, भरत फक्त गोमूत्रात शिजविलेल्या जवाच्या कण्या खातो, वल्कले नेसतो आणि जमिनीवर चटई टाकून झोपतो. तसेच त्याने जटा वाढविल्या आहेत. तेव्हा करुणेने भगवंतांचे हृदय भरून आले. जेव्हा भरताला समजले की, आपले ज्येष्ठ बंधू श्रीराम येत आहेत, तेव्हा तो नागरिक, मंत्री आणि पुरोहितांना बरोबर घेऊन आणि श्रीरामांच्या पादुका डोक्यावर ठेवून त्यांच्या स्वागतासाठी निघाला. जेव्हा भरत आपले राहाण्याचे ठिकाण नंदीग्राम येथून निघाला, तेव्हा लोक त्याच्याबरोबर मंगलगीते गात व वाद्ये वाजवीत चालू लागले. वेदवेत्ते ब्राह्मण वारंवार वेदमंत्रांचे पठण करीत होते. सर्वत्र सोनेरी पताका फडकत होत्या. रंगी-बेरंगी ध्वजांनी सजविलेले सुवर्णरथ, सोन्याचे खोगीर घातलेले सुंदर घोडे, तसेच सोन्याची चिलखते घातलेले सैनिक त्यांच्याबरोबर चालू लागले. शेठ-सावकार, श्रेष्ठ वारांगना आणि पायी चालणारे सेवक महाराजांना योग्य अशा लहान-मोठ्या भेटवस्तू बरोबर घेउन त्यांच्या बरोबर निघाले. श्रीरामांना पाहताच प्रेमाचा उद्रेक होऊन भरताचे हृदय आणि डोळे भरून आले. अशा स्थितीत त्याने त्यांच्या चरणांवर लोटांगण घातले ॥ 34-39 ॥

पादुके न्यस्य पुरतः(फ्), प्रां(ञ्)जलिर्बाष्पलोचनः ।
तमाश्लिष्य चिरं(न्) दोर्भ्यां(म्), स्नापयन् नेत्रजैर्जलैः ॥ 40॥

प्रां(ञ्)जलिर्+ बाष्प+ लोचनः, नेत्रजैर्+ जलैः

त्याने प्रभुंच्या समोर त्यांच्या पादुका ठेवल्या आणि तो हात जोडून उभा राहिला. तेव्हा त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहात होत्या. श्रीरामांनी आपल्या दोन्ही हातांनी भरताला पुष्कळ वेळपर्यंत आपल्या हृदयाशी कवटाळले आणि आपल्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी त्याला न्हाऊ घातले. ॥ 40 ॥

रामो लक्ष्मणसीताभ्यां(वँ), विप्रेभ्यो येऽर्हसत्तमाः ।
तेभ्यः(स्) स्वयं(न्) नमश्चक्रे, प्रजाभिश्च नमस्कृतः ॥ 41॥

त्यानंतर सीतादेवी आणि लक्ष्मणासह त्यांनी ब्राह्मण आणि पूजनीय गुरुजनांना नमस्कार केला. आणि प्रजेने श्रीरामांना भक्तिभावाने नमस्कार केला. ॥ 41 ॥

धुन्वन्त उत्तरासं(ङ्)गान्, पतिं(वँ) वीक्ष्य चिरागतम् ।
उत्तराः(ख्) कोसला माल्यैः(ख्), किरन्तो ननृतुर्मुदा ॥ 42॥

त्यावेळी अयोध्येतील सर्व प्रजेने, आपले स्वामी पुष्कळ दिवसांनंतर परत आल्याचे पाहून आपले दुपट्टे हवेत उडवीत पुष्पवर्षाव करून आनंदाने नाचण्यास सुरुवात केली ॥ 42 ॥

पादुके भरतोऽगृह्णाच्- चामरव्यजनोत्तमे ।
विभीषणः(स्) ससुग्रीवः(श्), श्वेतच्छत्रं(म्) मरुत्सुतः ॥ 43॥

भरतोऽ+ गृह्णाच्, चामरव् + यजनोत्तमे, श्वेतच्+ छत्रं(म्)

भरताने हातात पादुका घेतल्या. बिभीषणाने उत्कृष्ट चवऱ्या, सुग्रीवाने पंखा आणि श्रीहनुमंतांनी पांढरे छत्र धरले ॥ 43 ॥

धनुर्निषं(ङ्)गां(ञ्)छत्रुघ्नः(स्), सीता तीर्थकमण्डलुम् ।

अबिभ्रदं(ङ्)गदः(ख्) खड्गं(म्), हैमं(ञ्) चर्मर्क्षराण् नृप ॥ 44॥

धनुर्निषं(ङ्)गां(ञ्) + छत्रुघ्नः(स्)

परीक्षिता, शत्रुघ्नाने धनुष्य व भाता, सीतादेवींनी तीर्थाने भरलेला कमंडलू, अंगदाने सोन्याचे खड्ग आणि जांबवानाने ढाल घेतली ॥ 44 ॥

पुष्पकस्थोऽन्वितः(स्) स्त्रीभिः(स्), स्तूयमानश्च वन्दिभिः ।

विरेजे भगवान् राजन्, ग्रहैश्चन्द्र इवोदितः ॥ 45॥

पुष्पकस् + थोऽन्वितः(स्), स्तूय+ मानश्च, ग्रहैश्+ चन्द्र

या लोकांसह श्रीराम पुष्पक विमानात विराजमान झाले. योग्य स्थानांवर स्त्रिया बसल्या. भाट स्तुती करू लागले. राजा ! ग्रह-ताऱ्यांनी चंद्र शोभावा, तसे यावेळी भगवान श्रीराम शोभून दिसत होते ॥ 45 ॥

भ्रातृभिर्नन्दितः(स्) सोऽपि, सोत्सवां(म्) प्राविशत् पुरीम् ।

प्रविश्य राजभवनं(ङ्), गुरुपत्नीः(स्) स्वमातरम् ॥ 46॥

भ्रातृभिर्+ नन्दितः(स्)

गुरून् वयस्यावरजान्, पूजितः(फ्) प्रत्यपूजयत् ।

वैदेही लक्ष्मणश्चैव, यथावत् समुपेयतुः ॥ 47॥

अशा प्रकारे बांधवांच्या स्वागताचा स्वीकार करीत भगवंतांनी आनंदोत्सव चाललेल्या अयोध्यानगरीत प्रवेश केला. त्यांनी राजमहालात प्रवेश करून आपली माता कौसल्या, अन्य माता, गुरुजन, बरोबरीचे मित्र आणि लहान यांचा यथायोग्य सन्मान केला. तसेच त्यांनी केलेल्या सन्मानाचा स्वीकार केला. श्रीसीतादेवी आणि लक्ष्मणसुद्धा सर्वांना ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार भेटले. ॥ 46-47 ॥

पुत्रान् स्वमातरस्तास्तु, प्राणां(म्)स्तन्व इवोत्थिताः ।

आरोप्याङ्केऽभिषिं(ञ्)चन्त्यो, बाष्पौघैर्विजहुः(श्) शुचः ॥ 48॥

स्वमातरस्+ तास्तु, आरोप्याङ्+ केऽभिषिं(ञ्)+ चन्त्यो, बाष्पौघैर्+ विजहुः(श्)

प्राणांच्या संचाराने मृतशरीरे उठावी, त्याप्रमाणे त्यावेळी त्या माता आपल्या पुत्रांच्या आगमनाने उठल्या. त्यांनी त्यांना आपल्या मांडीवर बसवून घेतले आणि नेत्रांतील अश्रृंनी त्यांना अभिषेक केला. त्यावेळी त्यांचा सर्व शोक नाहीसा झाला ॥ 48 ॥

जटा निर्मुच्य विधिवत्, कुलवृद्धैः(स्) समं(ङ्) गुरुः ।

अभ्यषिं(ञ्)चद् यथैवेन्द्रं(ञ्), चतुः(स्)सिन्धुजलादिभिः ॥ 49॥

चतुः(स्)सिन्+ धुजलादिभिः

त्यानंतर वसिष्ठांनी इतर गुरुजनांसह विधिपूर्वक भगवंतांच्या जटा उतरविल्या आणि बृहस्पतीने जसा इंद्राला अभिषेक केला, त्याचप्रमाणे त्यांना चारही समुद्रांच्या पाण्याने व इतर द्रव्यांनी अभिषेक केला ॥ 49 ॥

एवं(ङ्) कृतशिरः(स्)स्नानः(स्), सुवासाः(स्) स्रग्व्यलं(ङ्)कृतः ।

स्वलं(ङ्)कृतैः(स्) सुवासोभिर्- भ्रातृभिर्भार्यया बभौ ॥ 50॥

स्रग्+ व्यलं(ङ्)कृतः,भ्रातृभिर्+ भार्यया

अशा प्रकारे मंगल स्नान करून भगवान श्रीरामांनी सुंदर वस्त्रे, पुष्पमाळा आणि अलंकार धारण केले. सर्व बंधू आणि श्रीजानकीदेवींनी सुद्धा सुंदर सुंदर वस्त्रे आणि अलंकार परिधान केले. त्यांच्यासह भगवान श्रीराम अत्यंत शोभत होते ॥ 50 ॥

अग्रहीदासनं(म्) भ्रात्रा, प्रणिपत्य प्रसादितः ।

प्रजाः(स्) स्वधर्मनिरता, वर्णाश्रमगुणान्विताः ।

जुगोप पितृवद् रामो, मेनिरे पितरं(ञ्) च तम् ॥ 51॥

अग्रही+दासनं(म्)

भरताने त्यांच्या चरणांवर लोटांगण घालून त्यांची मनधरणी केली. तेव्हा भगवान श्रीरामांनी राजसिंहासनाचा स्वीकार केला. त्यानंतर ते, आपापल्या धर्मामध्ये तत्पर व वर्णाश्रमानुसार आचार करणाऱ्या आपल्या प्रजेचे पित्याप्रमाणे पालन करू लागले. त्यांची प्रजासुद्धा त्यांना आपला पिताच मानत होती ॥ 51 ॥

त्रेतायां(वँ) वर्तमानायां(ङ्), कालः(ख्) कृतसमोऽभवत् ।

रामे राजनि धर्मज्ञे, सर्वभूतसुखावहे ॥ 52॥

जेव्हा सर्व प्राण्यांना सुख देणारे धर्मज्ञ श्रीराम राजा झाले, तेव्हा वास्तविक त्रेतायुग होते, परंतु ते सत्ययुगच आहे असे वाटत होते ॥ 52 ॥

वनानि नद्यो गिरयो, वर्षाणि द्वीपसिन्धवः ।

सर्वे कामदुघा आसन्, प्रजानां(म्) भरतर्षभ ॥ 53॥

परीक्षिता ! त्यावेळी वने, नद्या, पर्वत, वर्षे, द्वीपे आणि समुद्र हे सर्व कामधेनूप्रमाणे प्रजेच्या सर्व कामना पूर्ण करीत ॥ 53 ॥

नाधिव्याधिजराग्लानि- दुःखशोकभयक्लमाः ।

मृत्युश्चानिच्छतां(न्) नासीद्, रामे राजन्यधोक्षजे ॥ 54॥

नाधिव्+ याधिजरा+ ग्लानि, मृत्युश् + चानिच्छतां(न्)

इंद्रियातीत भगवान श्रीराम राज्यावर असताना कोणालाही मानसिक चिंता किंवा शारीरिक रोग होत नसत. वृद्धावस्था, दुर्बलता, दुःख, शोक, भय आणि थकवा, नाममात्रसुद्धा नव्हते. एवढेच काय, ज्यांना मरण नको असे, त्यांचा मृत्यूही होत नसे. ॥ 54 ॥

एकपत्नीव्रतधरो, राजर्षिचरितः(श्) शुचिः ।

स्वधर्मं(ङ्) गृहमेधीयं(म्), शिक्षयन् स्वयमाचरत् ॥ 55॥

**एकपत्नी+ व्रतधरो**

**भगवान श्रीरामांनी एकपत्नीव्रत घेतले होते. त्यांचे चरित्र राजर्षीसारखे पवित्र होते. गृहस्थाला उचित अशा स्वधर्माचे शिक्षण देण्यासाठी ते स्वतः त्या धर्माचे आचरण करीत होते.॥ 55 ॥**

**प्रेम्णानुवृत्त्या शीलेन, प्रश्रयावनता सती ।**

**धिया ह्रिया च भावज्ञा, भर्तुः(स्) सीताहरन्मनः ॥ 56॥**

**प्रेम्णा+ नुवृत्त्या**

**पतिव्रता सीतादेवी आपल्या पतीच्या हृदयातील भाव ओळखून प्रेम, सेवा, शील, नम्रता, बुद्धी, लज्जा इत्यादी गुणांनी पतीचे चित्त वेधून घेत असत.॥ 56 ॥**

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म)स्यां(म) सं(म)हितायां(न्)**

**नवमस्कन्धे रामचरिते दशमोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥**

